**प्रेस नोट** दिनांक १९/०३/२०२५

१) श्रीमती.सिद्दिकी अहेमदी मोहम्मद अब्दुल मजीद ,वय ५७ वर्षे, पद मुख्याध्यापिका, मॉडल उर्दू हायस्कूल,परभणी रा.इनायत नगर,परभणी. (वर्ग २, शिक्षण विभाग) व २) बुढन खान महेबुब खान पठाण' वय ५३ वर्षे, पद कनिष्ठ लिपिक, मॉडल उर्दू हायस्कूल, परभणी रा.अजिजिया नगर,कृषी कॉर्नर,परभणी.(वर्ग ३, शिक्षण विभाग) हे १८,०००/- रूपयांची लाचमागणी प्रकरणी असेबीच्या जाळयात

| | |
|---|---|
| युनिट | लाप्रवि युनिट परभणी |
| पो.स्टे.गुरनं व कलम | पोस्टे कोतवाली गुरनं.११६/२०२५ कलम ७, १२ भ्र.प्र.अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक | दि.१९.०३.२०२५ रोजी १७:४६ वा. |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | १) श्रीमती.सिद्दिकी अहेमदी मोहम्मद अब्दुल मजीद,वय ५७ वर्षे, पद मुख्याध्यापिका, मॉडल उर्दू हायस्कूल,परभणी रा.इनायत नगर,परभणी. (वर्ग २, शिक्षण विभाग)<br>२) बुढन खान महेबुब खान पठाण' वय ५३ वर्षे, पद कनिष्ठ लिपिक, मॉडल उर्दू हायस्कूल, परभणी रा.अजिजिया नगर, कृषी कॉर्नर,परभणी.(वर्ग ३, शिक्षण विभाग) |
| लाचेची रक्कम | १८,०००/- रूपये |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार ह्या दिनांक १७/०३/२०२५ रोजी पर्यवेक्षक म्हणून त्यांचे वर्गात काम करीत असताना लोकसेवक बुढन खान पठाण यांनी वर्गात येऊन सांगितले की,''तुम्हाला माहे एप्रिल २०२४ ते सप्टेंबर २०२४ या सहा महिन्याचे प्रलंबित असणारे वेतन मिळालेले आहे. त्या वेतनातून एका महिन्याचे ३००० रुपये असे सहा महिन्याचे एकूण १८,००० रुपये मुख्याध्यापिका सिद्दिकी अहेमदी मॅडम यांनी मागितले आहेत ''. तक्रारदार यांनी लोकसेविका सिद्दिकी अहेमदी यांची भेट घेतली असता त्यांनी सहा महिन्याचे वेतनातून १८००० रुपये उद्या आणून द्या असे म्हटले. अशी लाच मागणीची तक्रार दि.१७/०३/२०२५ रोजी प्राप्त झाली होती.

दि.१८/०३/२०२५ रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी मध्ये तक्रारदार यांनी लाच रक्कम कमी करण्याची विनंती केली. लोकसेविका सिद्दिकी अहेमदी यांनी तक्रारदार यांना तुम्हाला मिळालेल्या सहा महिन्याचे प्रलंबित वेतनामधून १८००० रुपये द्यावे लागतील असे म्हणून लाचेची मागणी केली व लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शवली.

दिनांक १९/०३/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार ह्या लाचेची रक्कम लोकसेविका सिद्दिकी अहेमदी यांना देण्यासाठी पंचासह मॉडल उर्दू हायस्कूल,परभणी येथे पोहचल्या. तक्रारदार ह्यांनी लोकसेविका अहेमदी सिद्दिकी यांना सांगितले की, आपण सांगितले प्रमाणे १८,००० रुपये आणले आहेत. त्यावर लोकसेविका सिद्दिकी अहेमदी यांनी पंचासमक्ष सदर लाचेची रक्कम लोकसेवक बुढन खान पठाण यांचेकडे देण्यास सांगितली. लोकसेवक बुढन खान पठाण यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडून १८,००० रुपये लाचेची रक्कम लोकसेविका सिद्दिकी अहेमदी यांचे सांगणेवरुन स्विकारली. यावरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| सापळा पथक | सदरची सापळा कार्यवाही मा.श्री.संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड, डॉ.संजय तुंगार, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री.अशोक इप्पर, पोलीस उप अधिक्षक, श्री.बसवेश्वर जकिकोरे, पोलीस निरीक्षक, श्री.अल्ताफ मुलाणी, पोलीस निरीक्षक, सपोउपनि निलपत्रेवार, पोह सिमा चाटे, पोशि बोधनकर,कदम, नागरगोजे,घुले,आदमे, चापोह कदम, नरवाडे लाप्रवि परभणी यांनी पार पाडली. |
| सापळा अधिकारी | श्री.अशोक इप्पर, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि परभणी. ९२७२१११०६४ |
| तपास अधिकारी | श्री.अल्ताफ मुलाणी, पोलीस निरीक्षक, लाप्रवि परभणी. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी. | |
| **दुरध्वनी क्रमांक** :- 02452-220597 **टोल फ्री क्रमांक**:- 1064 **ऑनलाईन ॲप** acbmaharastra.net | |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |
| **9272111064** | |

पोलीस उप अधीक्षक उप अधिक्षक अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो परभणी

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी